# नियमित दिवाणी दावा क्र.८३/२०१८

**सीएनआरक्रएमएचओएस०२००२३०५२०१८**

बेबी उर्फ शकुंतला व इतर ... वादी

विरुध्द

महाराष्ट्र शासन व इतर ... प्रतिवादी

## निशाणी ६४ खालील आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.५ यांचे विरुध्द दिनांक ०८.०६.२०२२ रोजी झालेला नि.क्र.४९ वरील 'उलट तपास नाही' हा आदेश रद्द होउन त्यांना वादीतर्फे साक्षीदार क्र.१ जयसिंग पवार याचा उलट तपास घेण्याची संधी देण्यात यावी याकरीता दिला आहे. अर्जातील कथने अशी की, सदर प्रकरणात दाव्याशी व पुराव्याशी संबंधित महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने प्रतिवादी क्र.५ हे वादीचा उलटतपास घेऊ शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.५ यांनी उलटतपास घेण्यास जाणुन बुजुन टाळाटाळ केलेली नाही किंवा प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने टाळाटाळ केलेली नाही. वादीचा उलटतपास न घेतल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ यांचे विरुध्द झालेला उलट तपास नाही आदेश रद्द करावा अशी प्रतिवादीची विनंती आहे.

२. वादी यांनी अर्जावर आपले म्हणणे देउन सदर अर्जास हरकत घेतली आहे. वादीचे म्हणणे आहे की, उलट तपास नाही हा आदेश रद्द करण्याकरीता प्रतिवादी क्र.५ ने दाखल केलेल्या अर्जामध्ये कोणतेही योग्य ते कारण नमुद केले नाही.

३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे विचारात घेता तसेच दोन्ही बाजूंचा युक्तीवाद विचारात घेता असे दिसून येते की, वादीने प्रस्तूतचा दावा, घोषीत होवुन मिळण्याकरीता व रक्कम वसुलीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ जयसिंग पवार यांचा उलट तपास न घेतल्याने त्यांचे विरुध्द उलट तपास नाही असा आदेश दिनांक ०८.०६.२०२२ रोजी पारीत करण्यात आला. अशा परिस्थिती मध्ये दाव्याचे स्वरुप विचारात घेउन व दाव्याचा गुणदोषावर निकाल लावण्याकरीता, नैसर्गिक न्याय तत्वानुसार प्रतिवादी क्र.५ यांना उलट तपास घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. दाव्यास झालेला विलंब विचारात घेता प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब खालील आदेश.

## आ दे श

१. अर्ज (नि.क्र.६४) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.५ यांनी रक्कम रु.१०००/-(रुपये एक हजार फक्त ) खर्चापोटी भरल्यानंतर त्यांचे विरुध्द झालेला नि. क्र. ४९ वरील दिनांक ०८.०६.२०२२ रोजीचा उलट तपास नाही हा आदेश रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRADNYA VASANT MEDHE
Date: 2025.03.07 15:21:50 +0530

( श्रीमती प्रज्ञा व. मेढे )

दि. ०६.०३.२०२५ २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ .स्तर,

उस्मानाबाद.

नियमित दिवाणी दावा क्र.८३/२०१८
नि.क्र.६४ वरील आदेश

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

Name of Stenographer--S.T. Waghe, Stenographer (Grade-II)

Court-- 2nd Jt.Civil Judge, Senior Division Osmanabad

Date of Dictation-- 06/03/2025

(Directly taken on computer)

Date of Typing -- 06/03/2025

Order signed by the

Presiding Officer on-- 06/03/2025

Order Uploaded on-- 07/03/2025